* किडनाशके फवारणीसाठी हाता पायावर जखम असलेल्या व्यक्तीची निवड करू नये. फवारणी एकाच व्यक्तिकडून सतत न करून घेता आळीपाळीने करून घ्यावे.

* फवारणी दरम्यान नोझल गच्च झाल्यास किंवा कचरा अडकल्यास तोंडाने साफ न करता तारेच्या सहाय्याने साफ करावे.

* फवारणीचे काम पुर्ण झाल्यावर अंगावरील कपडे स्वच्छ धुवावे त्यानंतर सर्व अंग साबन लावून स्वच्छ पाण्याने धूवावे व अंग कोरडया स्वच्छ टॉवेलने पुसुन दुसरे कपडे घालावे.

* किडनाशकाचे रिकामे डब्बे तसेच शेतात फेकुन न देता पाण्याचे स्त्रोत विहीर, नदीपासून दुर जमीनीत खोल गाडून टाकावे.

* फवारणी करतांना पंपाच्या विशिष्ट दाबानुसार फवारणीचे तुषाररूपी द्रावण बाहेर पडतात त्यामुळे फवारणाऱ्याने चालण्याचा वेग नियंत्रीत करून झाडे नेमकीच सर्व बाजुनी ओलीचींब होवून द्रावण थेंबारूपाने खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**विषबाधीत व्यक्तीची घ्यावयाची काळजी :**

* विषबाधा झाल्यास वेळ न घालवता बाधीत व्यक्तीस अपघात स्थळापासून सावलीच्या ठिकाणी न्यावे व ताबडतोब प्रथमोपचार करावा.

* विषबाधीत व्यक्तिचे अंग/ बाधीत अवयव ताबडतोब साबण लाऊन स्वच्छ पाण्याने धुवावे व कोरडया स्वच्छ टॉवेलने पुसावे.

* विषबाधीत व्यक्तिला जास्त घाम येत असल्यास कोरडया टॉवेलने पुसावे.

* किडनाशक पोटात गेलेले असल्यास विषबाधीत व्यक्तिला ताबडतोब ओकारी करण्याची उपाययोजना करावी.

* विषबाधीत व्यक्तिला पिण्यासाठी दुध तसेच बिडी/सिगारेट व तंबाखू देऊ नये.

* विषबाधीत व्यक्तिला थंडी वाजत असल्यास अंगावर पांघरूण द्यावे.

* विषबाधीत व्यक्तिचा श्वासोच्छवास योग्य रितीने सुरू आहे का ते तपासावे. श्वासोच्छवास अनियमित किंवा बंद झाल्यास त्वरीत रोग्याच्या तोंडाला तोंड लावून कृत्रिम श्वासोच्छवास सुरू करावा.

* विषबाधीत व्यक्तीला झटके येत असल्यास त्याच्या दातामध्ये मऊ कापडाची छोटी गुंडाळी टाकावी.

* विषबाधीत व्यक्ती बेशुध्द पडल्यास त्याला शुध्दीवर आणावयाचे प्रयत्न करावे परंतु काहीही खाऊ घालण्याचे प्रयत्न करू नये.

* विषबाधीत व्यक्तीस त्वरीत किटकनाशकांच्या माहिती पत्रकासह डॉक्टरांकडे दाखवावे किंवा दवाखान्यात दाखल करावे व डॉक्टरांच्या निगराणीत उपचार करावे.

* विषबाधीत व्यक्ती बरा झाल्यावर त्याची संपूर्ण वैंद्यकीय तपासणी करून घ्यावी.

* अधिक माहिती करीता कृषि विद्यापिठातील तज्ञ, कृषि विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच वैंद्यकीय अधिकारी/डॉक्टर यांचेशी संपर्क साधावा.

घडीपत्रिका डॉ.पंदेकृवि/ प्रका/ ११७८ /२०१९

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

## कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ-१

व

केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

यांचे संयुक्त विद्यमाने

# किडनाशकांची खरेदी, हाताळणी व फवारणी करतांना घ्यावयाची काळजी




**डॉ. प्रमोद मगर**
विषय विशेषज्ञ (कीटकशास्त्र)
मो.७७५७०८१८८५

**श्री. अमित जाधव**
वरिष्ठ संशोधन सहकारी

**डॉ. सुरेश नेमाडे**
कार्यक्रम समन्वयक
मो.९४२१७७१३३४

**श्री. भास्कर कुमरे**
प्रकल्प सहाय्यक

## कृषी विज्ञान केंद्र,


वाघापूर रोड, यवतमाळ-१

# किडनाशकांची निवड

किडींच्या नुकसानीचा प्रकार, प्रादुर्भावाची तिव्रता, आर्थिक नुकसानीची पातळी, अवस्था आणि किडीच्या तोंडाची रचना (सोंड/जबडे) कशी आहेत, यावरून किडनाशकांची निवड करावी. सर्वसाधारणपणे पाने, फुले, फळे खाणाऱ्या अळयांच्या व्यवस्थापणाकरीता उदर विष (Stomach Poison) तसेच रस शोषक किडीच्या व्यवस्थापणा करीता आंतरप्रवाही (Systemic Poison) आणि जमीनीत वास्तव्य करणाऱ्या किडीच्या व्यवस्थापणा करीता धुरीजन्य (Fumigant Poison) किंवा जमीनीतुन दयावे लागणाऱ्या किडनाशकांची निवड करणे अधिक हिताचे व प्रभावी ठरते. फवारणीसाठी सर्वप्रथम मवाळ किडनाशकांची म्हणजेच ज्या किडनाशकांच्या डब्यावर हिरवा किंवा निळा त्रिकोण आहे अशाच किडनाशकांची निवड करावी व त्यानंतर गरज भासल्यास शेवटी जहाल (लाल, पिवळा त्रिकोण असलेले)किडनाशके वापरावीत. एकच एक किंवा एकाच गटातील किडनाशके वारंवार फवारणी न करता आवश्यक तेव्हा वरील उल्लेखीत बाबींचा विचार करून किडनाशकांची फेरपालट करून शिफारशीत मात्रेतच व केंद्रीय किटकनाशक मंडळाने शिफारशीत केलेली (लेबल क्लेम) किडनाशकांची फवारणी करावी. तणनाशके, बुरशीनाशके, रोगनाशके व इतर कोणतेही घटक शिफारस असल्याशिवाय मिसळून फवारू नयेत तसेच शक्य तोवर दोन घटकांचे द्रावण फवारणीसाठी टाळावे.

## किडनाशकांची मानवी शरीर व पर्यावरणावरील विषकारकता :

### किडनाशक विषकारकता दर्शक चिन्हे




किडनाशकांचे विषकारकते नुसार अति तिव्र विषारी, फार विषारी, मध्यम विषारी आणि किंचीत विषारी किडनाशके अशा चार श्रेण्यामध्ये वर्गीकरण केलेले आहे. अति तिव्र विषारी (वर्ग १ अ) किडनाशकाच्या आवेष्ठनावर पतंगीच्या आकारात लाल त्रिकोण असून त्रिकोणाच्या वरच्या बाजुस धोक्याचे चिन्ह व लाल अक्षरात Poison (विष) तर फार विषारी किडनाशकाच्या आवेष्ठनावर (डब्यावर) पतंगीच्या आकारात पिवळा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजुस अक्षरात Poison (विष) असे दर्शविलेले असून ही किडनाशके जहाल गटात मोडतात. तसेच मध्यम विषारी किडनाशकाच्या आवेष्ठनावर पतंगीच्या आकारात निळा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजुस अक्षरात Danger (धोका) आणि किंचीत विषारी किडनाशकाच्या आवेष्ठनावर पतंगीच्या आकारात हिरवा त्रिकोण व त्रिकोणाच्या वरच्या बाजुस अक्षरात Caution (दक्षता) असे दर्शविलेले असून सदर किडनाशके मवाळ गटात मोडतात.

### किडनाशके खरेदी करतांना घ्यावयाची काळजी

*किडनाशके परवाना धारक विक्रेत्या कडूनच खरेदी करावीत. खरेदी केलेल्या किडनाशकाचे विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे.

* लेबल क्लेम आणि शिफारस असलेले किडनाशक फवारणीसाठी आवश्यक तेवढयाच प्रमाणात खरेदी करावे.

* किडनाशके खरेदी करतांना माहीती (लिफलेट) पत्रकाची मागणी विक्रेत्या कडेच करून ते माहीती पत्रक वाचून/ ऐकून घेवून पुर्ण सूचनांचे पालन करावे व नंतरच खरेदी करावे.

*कालबाहय झालेल्या किंवा आवेष्टन खराब झालेल्या किडनाशकांची खरेदी करू नये.

*किडनाशक खरेदी करतेवेळी आवश्यक असलेले रासायनीक घटक पाहूनच खरेदी करावी.

### किडनाशके हाताळतांना व फवारतांना घ्यावयाची काळजी

*किडनाशके शेतात फवारणी करते वेळी प्रथमोपचार साहीत्य सोबत ठेवावे.

*खादय पदार्थ, इतर औंषधांशी किडनाशकांचा संपर्क येवू देवू नये. तसेच किडनाशके लहान मुलांच्या संपर्कात येणार नाही अशा गुपीत ठिकाणी कुलुप बंद ठेवावीत पिक, किड व रोग निहाय किडनाशकाची निवड करून शिफारशीत प्रमाणातच फवारणीसाठी वापरावी.

* किडनाशक वापरण्यापुर्वी लेबल व माहीती पत्रक व्यवस्थित वाचून खबरदारीच्या सर्व सुचनांचे पालन करावे. तसेच किडनाशकांच्या डब्यावरील पतंगीच्या आकारचे चिन्हे लक्षात घेवून किडनाशक निवडून शिफारशीनुसार वापर करावा.

* तणनाशके फवारणीचा पंप चुकुनही किडनाशक फवारणी साठी वापरू नये. गळक्या फवारणी पंपाचा वापर फवारणीसाठी करू नये.

* किडनाशक हाताळतांना नेहमी हातात हातमोजे घालावेत. किडनाशकाचे द्रावण हाताने न ढवळता काडीच्या सहाय्याने हातात हातमोजे घालूनच ढवळावे.

* फवारणी करतांना अंगरक्षक कपडे, हातमोजे, चष्मा, मास्क, टोपी, गनबुट इ. चा वापर करावा व संपुर्ण शरीर झाकले जाईल याची काळजी घ्यावी.

* फवारणीचे काम सुरू असतांना खाणे, पिणे, तंबाखुचे सेवण धुम्रपान अगर मध्यपान करू